# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.01.2025** **वार-बुधवार**

---

**जीबीएस**

पुणे आणि पिंपरी- चिंचवड महापालिका क्षेत्रात गुइलेन बॅरे सिंड्रोम या आजारावर विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. तसंच रुग्ण आढळले आहेत त्या भागात महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सर्वेक्षण करण्यात येत आहे. सुरूवातीला या आजाराचे बावीस रुग्ण पुण्यातील सिंहगड आणि इतर भागात आढळल्याचं सांगण्यात आलं. यानंतर आता ही संख्या काहीशी वाढली असून बाधित रुग्णांची संख्या 24 वर गेली आहे. पुणे महापालिका हद्दीत 5, पिंपरी-चिंचवड महापालिकेत 2, ग्रामीण भागात 16 आणि पुणे जिल्हा बाहेरील 1 असे रुग्ण आढळूले आहेत. यापैकी 8 रुग्णांवर अतिदक्षता विभागामध्ये उपचार केले जात आहेत. या आजाराची गांभीर्यानं दखल घेऊन याचं विश्लेषण करण्यासाठी नऊ जणांची समिती नेमण्यात आली आहे. या समितीमध्ये एनआयव्ही, राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे महापालिकेचे आरोग्य अधिकारी, आणि स्वंयसेवी संस्थांचा सहभाग आहे. या आजारामुळं शरिराची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. बहुतांश बाधित रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता भासते. खबरदारी म्हणून नागरिकांनी पाणी उकळून प्यावं, असं आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.

**घनकचरा**

घनकचरा व्यवस्थापनाकरिता पुणे महापालिकेला अधिक जागा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल असं महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी सांगितलं. कदम आणि अन्य अधिकाऱ्यांनी पुणे पालिकेला भेट देऊन प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांविषयी माहिती घेतली. यानंतर महापालिका आणि एमपीसीबी अधिकाऱ्यांची बैठक झाली. पुणे शहरात प्लास्टिकचा वापर रोखण्यासाठी महापालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाच्या माध्यमातून संयुक्त कारवाई केली जाणार आहे. यात महापालिकेनं आपल्या स्तरावर दंड कमी अधिक करावा असं सिद्धेश कदम यांनी स्पष्ट केलं.

**दिव्यांग**

दिव्यांग व्यक्तींना दिव्यांग प्रमाणपत्र देण्याची सुविधा आता तालुकास्तरावर उपलब्ध होणार आहे. तालुका स्तरावर 100 खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपल्या स्तरावरून जिल्ह्यातील विशेषज्ञांची समिती स्थापन करावी आणि या समितीद्वारे महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शुक्रवारी दिव्यांग प्रमाणपत्र शिबिरं आयोजित करून प्रलंबित दिव्यांग प्रमाणपत्राचा निपटारा करावा, असे निर्देश सर्व उपसंचालक, आरोग्य

सेवा परिमंडळ, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालयांना आरोग्य विभागानं दिले आहेत. सर्व 21 प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी दिव्यांग व्यक्तींना ऑनलाईन दिव्यांगत्व प्रमाणपत्र देणं बंधनकारक आहे.

**स्थानक**

दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त पुढील वर्षभर एसटीच्या राज्यभरातील सर्व बसस्थानकांवर शिवसेना पक्षनेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान राबविण्यात येणार आहे. तीन कोटी रुपयांची बक्षिसं या अभियानाच्या अंतर्गत वाटण्यात येणार असून राज्यात 'अ' वर्गात प्रथम येणाऱ्या बसस्थानकाला 1 कोटी रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात येईल अशी घोषणा राज्याचे परिवहन मंत्री, प्रताप सरनाईक यांनी केली आहे. या अभियानाचा शुभारंभ उद्या 23 तारखेला सरनाईक यांच्या हस्ते कुर्ला नेहरूनगर बस स्थानकावर होणार आहे. यानिमित्तानं सर्व राज्यभर प्रत्येक बसस्थानकावर शालेय विद्यार्थी, सामाजिक संस्था आणि एसटी कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

**निधन**

सदाशिव पेठेतील श्री स्वामी मठाचे अध्यक्ष सुधाकर गणेश नाईक यांचं काल पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. ते 85 वर्षांचे होते. अनेक सामाजिक आणि धार्मिक संस्थांसोबत त्यांचे घनिष्ट संबंध होते.

**कुस्ती**

67 वी राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा आणि महाराष्ट्र केसरी किताबी लढतीसाठी राष्ट्रीय तालीम संघाच्या पुणे जिल्ह्याचा संघ निवडण्यात येणार आहे. ही निवड चाचणी 25 जानेवारी रोजी होणार आहे. 57 ते 125 किलोपर्यंत वजनी गटात लढती छत्रपती शिवाजी स्टेडियम इथं होणार आहेत.

**क्लायंबिंग**

साहसी क्रीडा प्रकारात मोडणारी स्पोर्ट्स क्लायबिंग राष्ट्रीय स्पर्धा नुकतीच बंगळुरू इथं पार पडली. स्पर्धेत पुण्याच्या खेळाडूंनी उप-कनिष्ठ गटात नील वारके यानं रौप्य तर मुलींमध्ये ध्रुवी पडवळ हिनं कास्यपदक मिळविलं. कनिष्ठ गटात श्रीहान मराठे यानं रौप्य पदक जिंकलं. या स्पर्धेत देशभरातून 142 स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**